## रेग्युलर कज्जा क्रं.१५०/१९९८ मधील निशाणी १६० वरील आदेश.

## ( **CNR No**.:- **MHKO**070001051998)

वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये असे कथन केले आहे की, सदरहू दावेमध्ये नि.३ कडील अ.क्र.१ ला स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी मठ संस्थान म्हणजेच मूळ वादी क्र.२ यांनी भूजगोंडा दादा पाटील यांचे नावे दावा मिळकतीच्या संदर्भात दि.१८/०७/१९९६ रोजी करुन दिलेल्या अस्सल वटमुखत्यारपत्राची झेरॉक्स प्रत हजर केली आहे. सदर वटमुखत्यारपत्राचा शोध घेवूनही ते सापडू शकलेले नाही त्यामुळे ते अस्सल वटमुखत्यार पत्र गहाळ झालेले आहे. वादी यांनी सदरचे वटमुखत्यारपत्र करुन देण्यात आले होते ही बाब दुय्यम पुराव्याने सिध्द करण्याकामी नि.१५६ कडे तहसिलदार कार्यालयातील कारकूनाचा जबाब घेतलेला असून त्यांनी त्यांच्या जबाबामध्ये दि.१८/०७/१९९६ रोजी वटमुखत्यारपत्र केल्याचे अस्सल रजिस्टर व त्याचे स्थळपत्र असे संबंधीत कागद गहाळ झालेबाबत तहसिलदार शिरोळ यांचे पत्र नि.१५७ ला हजर केलेले आहे. तसेच दि.१८/०७/१९९६ रोजीचे अस्सल वटमुखत्यार पत्र आर.जे.जाधव, पिटीशन रायटर, शिरोळ यांनी टाईप केले असून त्या वटमुखत्यारपत्रावर ओळख ही त्यांनीच घातली आहे, तेव्हा त्यांचा साग्र जबाब नि.१५८ ला घेतला असून तसेच वटमुखत्यारपत्र विशेष दंडाधिकारी, शिरोळ यांनी त्यांचे समक्ष करुन दिल्याबाबतही त्यांचे जबाबात स्पष्ट आलेले आहे. वादी यांनी सदरहू साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यामधून नि.३/१ कडील दिनांक १८/०७/१९९६ रोजीचे वटमुखत्यारपत्र करुन देण्यात आलेले होते याबाबत वादीतर्फे सदरचा दुय्यम पुरावा देण्यात आलेला आहे, तरी सदरच्या दुय्यम पुराव्याचा विचार

करता वादीतर्फे नि.३/१ कडे दाखल करण्यात आलेल्या वटमुखत्यारपत्राच्या झेरॉक्स प्रतीला निशाणी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी नि.१६२ कडे आपले म्हणणे दाखल केले असून अर्जातील कथने नाकारली असून असे कथन केले आहे की, सदर कामी तथाकथीत अस्सल वटमुखत्यापत्र गहाळ झाले म्हणून वादीनी त्यासंदर्भात दुय्यम पुरावा करणेसंदर्भात वादीनी मे.कोर्टाची परवानगी घेतलेली नसल्याने वादीनी त्या संदर्भात जो पुरावा केलेला आहे तो पुरावा वाचता येणार नाही. तसेच सदर कामी तहसिलदार कार्यालयातील संबंधीत कारकूनाचा झालेला जबाब पहाता त्यांने त्याच्या जबाबात तथाकथीत वटमुखत्यारपत्र त्यांच्या कार्यालयात नोंद केलेले आहे व त्या संदर्भातील कागदपत्रे आढळून येत नाहीत असे कोठेही सांगीतलेले नाही. तसेच पिटीशन रायटर श्री.आर.जे.जाधव यांचा जबाब पाहिला असता त्यांनी अस्सल दस्त पाहिल्याशिवाय त्यावरील सहया ओळखू शकत नाही असे स्पष्टपणे कबूल केलेले आहे. त्यामुळे झालेला पुरावा पहाता तथाकथीत वटमुखत्यारपत्र हे कायदयाप्रमाणे शाबीत न झालेने त्यास निशाणी देता येणार नाही. सबब, वरील सर्व कारणांना विचार होवून सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी प्रतिज्ञापत्रासह केलेला असुन त्यामध्ये मुळ वटमुखत्यार पत्र हे गहाळ झाल्याचे शपथपत्रामध्ये कथन केलेले आहे. प्रतिवादी यांनी सदर वटमुखत्यारपत्राबाबतची कथने ही प्रतिकथनाद्वारे नाकारलेली नाहीत. वादी यांनी सदरचे वटमुखत्यार पत्र लिहिणार यांची साक्ष घेतलेली असुन त्यामध्ये त्यांनी सदरचे वटमुखत्यार पत्र लिहिल्याचे व ते कशाप्रकारे नोंदविण्यात आले हे सांगितले असुन त्यावर त्याची सही व शिक्का असल्याचे कबुल केलेले आहे व त्यास उलटतपासामध्ये आव्हानीत करण्यात आलेले नाही. तसेच सदरहू वटमुखत्यारपत्राच्या सिध्दतेसाठी वादी यांनी तहसिलदार कार्यालयाच्या

संबंधीत व्यक्तीची साक्ष घेण्यात आलेली आहे. त्याने त्याच्या साक्षीपुराव्यामधुन सदरहू वटमुखत्यारपत्राच्या अनुशंगाने त्याच्याकडे ठेवण्यात आलेली कागदपत्रे ही नाश करण्यात आल्याबाबतचे पत्र दिलेले आहे. सबब, वादी यांनी सदरचा दस्त हा दुय्यम पुरावा म्हणुन वाचण्याकामी आवश्यक असलेल्या भारतीय पुरावा कायदा कलम ६५(क) बाबीची पुर्तता केलेली असुन सदरचा दस्त यांत्रीकीपध्दतीने मुळ दस्तावरुन तयार करण्यात आलेला असल्याने सदरचा दस्त हा भारतीय पुरावा कायदा कलम ६३(२) अन्वये दुय्यम पुरावा म्हणुन वाचता येईल. वादीतर्फे त्याच्या कथनाच्या पुष्टीसाठी पुढील न्यायनिवाडयाचा आधार घेण्यात आलेला आहे.

**“Madras High Court, CRP.(PD)(MD)No.882 of 2006 and M.P.(M.D.)No.1 of 2006, Jansirani *Versus* G.Loganathan, on 05/04/2007 ”**

४. प्रतिवादी तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दावा दाखल करत असताना वादी यांच्या दस्तावर अवलंबून दावा दाखल करत असतात, तो मुळ दस्त वादी यांनी हजर करणे आवश्यक असते, प्रस्तुत प्रकरणात वादी यांनी दावा दाखल करत असताना वटमुखत्यारपत्राची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे यावरुन दावा दाखल करत असताना सदरहू वटमुखत्यारपत्राची मुळ प्रत वादी यांच्या ताब्यात होती असे दिसून येते अशा परिस्थीतीत जर दावा दाखल केल्यानंतर सदरची मुळ प्रत ही गहाळ झालेचे वादीचे कथन असेल तर त्यांनी तसे स्पष्टपणे प्रस्तुत अर्जात नमुद करणे गरजेचे होते. तसेच वादी यांना सदर वटमुखत्यारपत्राबाबत दुय्यम पुरावा दयावयाचा असेल तर त्यांना भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम ६५(क) मधील तरतुदीनुसार त्याकामी न्यायालयाचे परवानगी घेणे गरजेचे होते. वादी कडून अशाप्रकारे जर अर्ज करण्यात आला असता तर त्यावेळी सदरचा अर्ज मंजूर करत असताना भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम ६५(क) अन्वये आवश्यक असलेल्या सर्व बाबींची वादी यांनी पुर्तता केली आहे किंवा कसे हे पहाण्यात आले असते.

मात्र वादी यांच्याकडून अशाप्रकारची कोणतीही परवानगी न घेता सदरहू दस्तावरील साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत. तसेच दाव्यामध्ये दाखल केलेली झेरॉक्स प्रत ही मुळ दस्ताचीच झेरॉक्स आहे असे कोणतेही कथन नाही अथवा तसा पुरावा आणण्यात आलेला नाही. त्याचबरोबर दस्त लिहिणार साक्षीदार रावसाहेब पटवर्धन यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये सदरचा दस्त त्यांनी तयार केल्याचा बोध होत नसल्याचे कबूल केलेले आहे. त्याचबरोबर साक्षीदार अनिल यांनी सुध्दा त्यांच्या जबाबात सदरचा दस्त करण्यात आला होता असे सांगीतलेले नाही. अशा परिस्थितीत केवळ सदरच्या दस्तास निशाणी न दिल्याने वादीचे नुकसान होणार आहे या कारणास्तव सदरच्या दस्तास निशाणी देता येणार नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

५. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे आणि प्रकरणातील कागदपत्रे पाहिली. प्रकरणातील कागदपत्रे पहाता, वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल करतेवेळी नि.३/१ कडे दि.१८/०७/१९९६ च्या वटमुखत्यारपत्राची झेरॉक्स प्रत दाखल केल्याचे दिसून येत आहे. सदरहू झेरॉक्स प्रतीचे अवलोकन करता, दावा दाखल करतेवेळी सदरची झेरॉक्स प्रत ही सहाय्यक अधीक्षक यांनी मूळ वटमुखत्यारपत्राशी पडताळून पाहिल्याचे दिसून येत आहे. यावरुन दावा दाखल करतेवेळी वादी यांचेकडे मूळ वटमुखत्यारपत्र होते व त्यावरुनच दाव्यामध्ये दाखल करण्यात आलेली झेरॉक्स प्रत दाखल करण्यात आलेली आहे हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे वादी यांनी नि.३/१ कडे दाखल केलेली वटमुखत्यारपत्राची झेरॉक्स प्रत ही भारतीय पुरावा कायदा कलम ६३(२) चा विचार करता दुय्यम पुरावा या सदरात मोडत असल्याचे स्पष्ट होत आहे.

६. प्रतिवादी यांच्यातर्फे प्रस्तुत अर्जास घेण्यात आलेल्या हरकतीच्या अनुशंगाने व प्रस्तुत अर्जातील वादी यांची कथने पहाता, वादी

यांनी मूळ वटमुखत्यारपत्र हे शोधूनही सापडून न आल्याने गहाळ झाल्याचे शपथेवर कथन केलेले आहे. त्यामुळे जरी त्यामध्ये स्पष्टपणे मूळ वटमुखत्यारपत्र हे कधी गहाळ झाले हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही. त्याचबरोबर नि.३ सोबत दाखल केलेली वटमुखत्यारपत्राची झेरॉक्स प्रत ही मूळ दस्ताचीच असल्याच्या बाबी कथन केलेल्या नाहीत अथवा त्याबाबत पुरावा जरी आणला नाही या कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे योग्य होणार नाही. भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम ६५ मध्ये कोणत्या परिस्थीतीत दस्त ऐवजासंबंधी दुय्यम पुरावा देता येईल असे प्रसंग नमुद करण्यात आलेले आहेत. त्यामधील कलम ६५(क) अन्वये प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी केलेला आहे. सबब सदरची तरतूद पहाणे गरजेचे वाटते.

"६५(क) मूळ लेख नष्ट किंवा गहाळ झालेला असेल अथवा त्यातील मजकुराचा पुरावा देवू पाहणारा पक्षकार त्याच्या स्वतःच्या कसुरीमुळे किंवा हयगयीमुळे नव्हे तर अन्य कारणामुळे, तो वाजवी अवधीत हजर करु शकत नसेल अशा परिस्थितीत.''

७. वादी यांनी नि.३/१ कडे दाखल केलेल्या वटमुखत्यारपत्राची झेरॉक्स प्रत ही दुय्यम पुरावा म्हणून वाचता येईल हे सिध्द करण्यासाठी नि.३/१ कडील दस्ताचा मूळ दस्त लिहिणार रावसाहेब जाधव यांची साक्ष नोंदवली आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये सदरचे वटमुखत्यारपत्र हे त्यांनी टाईप केल्याचे व त्यांच्यासमोर वटमुखत्यारपत्र लिहून देणार व घेणार हयांनी सहया केल्या असल्याचे व त्यानंतर ते नायब तहसिलदार यांच्या सहीशिक्याने पूर्ण करण्यात आले असून त्यावर त्यांनी ओळख घातली असल्याचे सांगीतले आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये एखादया कागदावरील टायपिंग पाहिल्यानंतर ते त्यांनीच केलेले आहे हे त्यांना सांगता येणार नाही व त्यांनी

दस्तावर दस्तूर म्हणून सही केलेली नाही त्यामुळे सदरहू दस्त त्यांनी तयार केलेला आहे असा बोध होत नाही असे कबूल केलेले आहे. मात्र नि.३/१ कडे दाखल केलेल्या वटमुखत्यारपत्राचे अवलोकन करता त्यावर ओळख म्हणून आर.जे.जाधव, पिटीशन रायटर असा शिक्का असून त्यापुढे सही केलेली आहे. सदरची सही सदरहू साक्षीदाराने नाकारलेली नाही त्यामुळे सदरहू साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये दिलेल्या कबूल्यांवरुन सदरचा दस्तच झाला नाही असे म्हणणे न्यायोचित होणार नाही.

८. साक्षीदार रावसाहेब जाधव यांनी त्यांच्या साक्षीपूराव्यात त्यांच्यासमक्ष दि.१८/०७/१९९६ रोजी तहसिलदार निकम यांच्या सहीशिक्याने वटमुखत्यारपत्राचा दस्त पूर्ण करण्यात आल्याचे सांगीतले आहे. वादी तर्फे नि.३/१ कडे दाखल करण्यात आलेले वटमुखत्यारपत्र हे तहसिलदार कार्यालयात नोंदवण्यात आले होते ही बाब सिध्द करण्यासाठी तहसिलदार कार्यालयात संबंधीत लिपीक अजित कुरणे यांची साक्ष नोंदवलेली आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये नि.३/१ कडे दाखल असलेल्या वटमुखत्यारपत्राच्या झेरॉक्स प्रतीच्या अनुशंगाने त्यांच्या कार्यालयातील कागदपत्रे मिळून येत नसल्याबाबतचे सांगून तसे कार्यालयाचे पत्र नि.१५७ कडे दाखल केलेले आहे. मात्र नि.३/१ कडे दाखल केलेल्या वटमुखत्यारपत्राच्या झेरॉक्सप्रतीचे अवलोकन करता, त्यावर तहसिलदार कार्यालयाचा शिक्का असल्याचे दिसून येत आहे.

९. वरील सर्व बाबींचा दि.१८/०७/१९९६ रोजी वटमुखत्यार-पत्राचा दस्त नोंदविण्यात आला होता व त्याचीच झेरॉक्स प्रत वादी यांनी दावा दाखल करतेवेळी दाखल केल्याचे स्पष्ट होत आहे. वादी यांनी दुय्यम पुरावा देण्याबाबत न्यायालयाची परवानगी घेतलेली नसल्याने त्याबाबत केलेला पुरावा वाचता येणार नाही अशा प्रकारचा आक्षेप प्रतिवादी तर्फे घेण्यात आलेला आहे. मात्र अशा प्रकारचा दुय्यम पुरावा देत असताना न्यायालयाची परवानगी घेणे

आवश्यक असले बाबतची तरतूद दिसून येत नाही.

१०. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा शपथेवर दाखल केलेला आहे. तसेच दाव्यामध्ये नि.३ सोबत दाखल केलेली वटमुखत्यारपत्राची झेरॉक्स प्रत ही दुय्यम पुरावा म्हणून स्वीकारण्याबाबत तपासण्यात आलेले साक्षीदार अजित भाउसो कुरणे व रावसाहेब जनार्दन जाधव यांच्या साक्षीपुराव्यातून वादी यांनी नि.३/१ कडे दाखल केलेल्या वटमुखत्यारपत्राच्या झेरॉक्स प्रतीचा दस्त हा दि.१८/०७/१९९६ रोजी झाला होता ही बाब सिध्द केलेली आहे. एकंदरीत वादी यांनी नि.३/१ कडे दाखल केलेली वटमुखत्यार पत्राची झेरॉक्स प्रत ही दुय्यम पुरावा म्हणून स्वीकारण्यासाठी भारतीय पुरावा कायदा कलम ६५–क मधील बाबींची पूर्तता केलेली आहे. वादी यांनी दाखल केलेल्या न्यायनिवाडयामधील तथ्ये व प्रस्तुत अर्जामधील तथ्ये ही एकसारखी असल्याचे दिसून येत असून ती वादी यांच्या प्रस्तुत अर्जास लागू पडत असल्याचे दिसून येत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे हे न्यायोचित्त होईल. सबब, मी खालील आदेश पारित करतोः–

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज **नि.१६०** मंजूर करण्यात येत असून वादी यांनी नि.३/१ कडे दाखल केलेल्या वटमुखत्यारपत्राच्या झेरॉक्स प्रतीस निशाणी नंबर देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2021.01.06 15:30:07 +0530

ठिकाणः-जयसिंगपूर.
दिनांकः-०६/०१/२०२१.

( विश्वास पां.शिंदे )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर.